N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** यवतमाळ **P.S.(ठाणे):** कळंब

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0386 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 19/05/2026 23:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 19/05/2026
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/05/2026
   **Time From (वेळेपासून):** 16:50 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:59 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 19/05/2026 **Time (वेळ):** 23:33 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 032
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 19/05/2026 23:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भूमी अभिलेख कार्यालय कळंब, जि

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. सुधाकर फकरूजी दाते

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1975

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कोठा वेणी ता कळंब ,कळंब ,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कोठा वेणी ता कळंब ,कळंब ,यवतमाळ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8459366426

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती शितल विजयकुमार पांडे | | | 1. अग्रवाल लेआउट, रासा रोड कळंब,कळंब ,यवतमाळ,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 25,000/ रूपये ज्यात 500/ रूपये दराच्या 50 चलनी नोटा | 25,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**
25,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

पो.स्टे. कळंब, जि.यवतमाळ,
अप.क्र. /2026, कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988

तक्रारदार -- श्री. सुधाकर फकरूजी दाते, वय 51 वर्ष,जात- भोई धंदा- मजुरी, ह.मु. कोठा (वेणी) ता. कळंब जि. यवतमाळ मुळ पत्ता अग्रसेन भवन मागे, मरारटोली रामनगर, नागपुर
मो.क्र. 8459366426
आ.लो.से. -- आरोपी लोकसेविका श्रीमती शितल विजयकुमार पांडे, वय 37 वर्षे, जात-ब्राम्हण
पद - परिरक्षण भुमापक, भुमी अभिलेख कार्यालय, कळंब, ता. कळंब जि. यवतमाळ
पत्ता - अग्रवाल लेआउट, रासा रोड कळंब ता. कळंब, जि. यवतमाळ,
पंच क्रमांक --- श्री. अंकुश प्रकाश उडबगले, वय 35 वर्षे, पद वनरक्षक नेम. वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय यवतमाळ
पंच क्रमांक -- कु. कोमल धर्मपाल वानखडे, वय 32 वर्षे, पद वनरक्षक नेम. वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय यवतमाळ
घटनास्थळ -- सदरचे गुन्हयाचे घटनास्थळ हे भूमी अभिलेख कार्यालय कळंब, जि.यवतमाळ.
घटना तारीख वेळः-दिनांक 19/05/2026 चे 16.50 ते 16.59 वा. पर्यंत
जप्त माल -- 25,000/- रूपये ज्यात 500/- रूपये दराच्या 50 चलनी नोटा
कायमी अधि -- पोना 995/ निर्मल राठोड पो स्टे कळंब
हकीकत--अँ.क.ब्युरो,यवतमाळ कॅम्पः- कळंब दिनांक – 19/05/2026 फिर्यादमी अभय आष्टेकर, वय 51 वर्ष, पोलीस उपअधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळ फियर्दि देतो की, मी आज रोजी पोलीस उपअधीक्षक म्हणून अँन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय यतवमाळ येथे नेमणुकीस आहे. दिनांक 18/05/2026 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय यवतमाळ येथे हजर असतांना तक्रारदार नामे श्री. सुधाकर फकरूजी दाते, वय 51 वर्ष, धंदा-मजुरी, ह.मु. कोठा (वेणी) ता. कळंब जि. यवतमाळ मुळ पत्ता अग्रसेन भवन मागे, मरारटोली रामनगर, नागपुर मो. क्र. 8459366426यांचा फोन आला व त्यांनी कळंब येथील लोकसेविका विरुध्द तक्रार असल्याचे सांगीतले. त्यानंतर आम्ही त्यांना पंचासह कळंब येथे येवुन तुमची भेट घेतो असे सांगीतले. त्यानंतर आम्ही गोपनिय कामकाजाकरिता दोन पंच मिळणे करीता वन विभाग, यवतमाळ यांना पत्र दिल्याने त्यांनी तक्रारीची पडताळणी करीता दोन पंच उपलब्ध करुन दिले. त्यानंतर आम्ही पंच व स्टापसह कळंब येथील शेत शिवारात जावुन तक्रारदार यांना संपर्क करुन त्यांची भेट घेतली. आम्ही व पंच यांनी तक्रारदार यांची ओळख करुन घेतली तसेच तक्रारदार यांना आमची, पंचांची व स्टाफची ओळख करुन दिली. त्यानंतर तक्रारदार यांनी आम्हास व पंचास सांगीतले कि, मी काम करत असलेल्या माझे मालक डाॅ.दिलीप चंद्रशेखर देशपांडे यांच्या वडीलांचे निधन झाले आहे त्यामुळे त्यांचे व त्यांच्या वारसाचे नाव त्यांच्या वडिलांनी खरेदी केलेल्या कोठा शिवारातील शिट क्रमांक चार मधील प्लाॅट क्रमांक 354, 358, 361, 362 मध्ये लावण्यासाठी कळंब येथील भुमिअभिलेख कार्यालयातील परिरक्षण भुमापक श्रीमती शितल विजयकुमार पांडे, वय 37 वर्ष, यांची दि.11/05/2026 रोजी भेट घेतली असता त्यांनी माझ्याकडे वारस नाोंद करण्याकरिता 25,000/- रुपयांची मागणी केली आहे. या हकिकतीची तोंडी तक्रार सांगीतली. त्यानंतर त्यांनी त्यांची लेखी तक्रार आमच्याकडे दिली ती पुढीलप्रमाणे:-मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय यवतमाळ येथे येवुन समक्ष माझी लेखी तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी माझे परीवारासह राहत असुन माझे शिक्षण पाचवी पर्यंत झाले असुन मला मराठी भाषा लिहता व वाचता येते. डाॅ. गिरीश चंद्रशेखर देशपांडे रा. तिलक नगर, नागपुर यांचा नागपुर मध्ये वैदयकीय व्यवसाय असुन ते परीवारासह नागपुर येथे राहतात.

त्यांचे वडील श्री. चंद्रशेखर वामन देशपांडे व काका श्री. मुकूंद वामन देशपांडे यांचे मालकीची शेती व प्लॉट कोठा (वेणी) शिवारात असुन त्याचे देखभालीचे काम मी करीत असतो. श्री. चंद्रशेखर वामन देशपांडे व श्री. मुकूंद वामन देशपांडे हे मयत असुन त्यांचे नावे असलेले कोठा शिवारातील शिट क्र. 04 मधील प्लॉट क्र. 354, 358, 361,362 हे कायदेशीर वारस श्री. गिरीश देशपांडे, स्पृहा आकांत, भाग्यश्री देशपांडे, पार्थ अभिजीत देशपांडे, मानस अभिजीत देशपांडे यांचे नावे करावयाची आहेत. श्री. गिरीष देशपांडे व त्यांचे नातेवाईक यांना कळंब येथे प्लॉट संबधाने शासकीय कामकाजासाठी येणे शक्य नसल्याने नमुद प्लॉटचे शासकीय कामकाज करण्याकरीता त्यांनी मला स्टॅम्प पेपरवर लिहुन देवुन अधिकारपत्र दिले आहे.दि. 11/05/2026 रोजी मी श्री. गिरीश देशपांडे व त्यांचे नातेवाईक यांचे नावे प्लॉटचे मालकी हक्कासंबधाने फेरफार होणेकरीता तालुका भुमीअभिलेख कार्यालय, कळंब जि. यवतमाळ येथील श्रीमती पांडे, परिरक्षण भुमापक यांची भेट घेतली असता, त्यांनी मला सांगीतले की, श्री. चंद्रशेखर वामन देशपांडे व श्री. मुकूंद वामन देशपांडे यांचे नावे असलेल्या प्लॉटची त्यांचे कायदेशीर वारस श्री. गिरीश देशपांडे, स्पृहा आकांत, भाग्यश्री देशपांडे, पार्थ अभिजीत देशपांडे, मानस अभिजीत देशपांडे यांचे नावे फेरफार घ्यावयाची असेल तर, आधी ऑनलाईन अप्लीकेशन करून कागदपत्रे अपलोड करण्यास सांगीतले व त्यांचेकडे प्रकरण आल्यानंतर वारसाचे नावे फेरफार करण्याकरीता 25,000 रू. (पंचवीस हजार रूपये) दयावे लागतील. असे म्हणुन श्रीमती पांडे, परिरक्षण भुमापक, यांनी लाचेची मागणी केली आहे. त्यांनी माझा अर्ज स्विकारला नाही व मला अर्ज ऑनलाईन करा व पैसे घेवुन या असे बोलले. मी त्यांचेविरूध्द कायदेशीर तक्रार आज रोजी समक्ष लाचलचुपत प्रतिबंधक विभाग कार्यालय यवतमाळ, कॅम्प कळंब शेत शिवार येथे माझी लेखी तक्रार देत आहे. माझी श्रीमती पांडे, परिरक्षण भुमापक, भुमी अभिलेख कार्यालय कळंब यांचेशी कोणत्याही प्रकारचे दुष्मनी नसुन त्यांचेसोबत कोणत्याही प्रकारचा पैशाचा उसणवारीचा व्यवहार आमच्यात नाही. मी माझे तकारीसोबत पुढील कार्यवाही करण्याकरीता भुमी अभिलेख कार्यालय येथे ऑनलाईन अप्लीकेशन केलेल्या अर्जाचा छायांकित प्रती व अधिकार पत्राची छायांकीत प्रत सादर करीत आहे.तक्रारदार यांची तोंडी व लेखी तक्रार एकच असल्याची आमची व पंचांची खात्री झाल्याने आम्ही व पंचांनी त्यावर स्वाक्ष-या केल्या. त्यानंतर तक्रारदार यांनी आम्हाला व पंचांना त्यांच्या तक्रारीची पडताळणी करण्याकरिता व लोकसेविका श्रीमती पांडे यांची भेट घेण्याकरिता पाठविण्याची विनंती केली असता तक्रारदार व पंच यांना लोकसेविका श्रीमती पांडे यांची भेट घेण्याकरिता भुमिअभिलेख कार्यालय, कळंब येथे दि.18/05/2026 रोजी रवाना केले होते. तेथे तक्रारदार यांनी लोकसेविका यांची पंचासमक्ष भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांनी केलेल्या ऑनलाईन अर्ज आवक जावक येथे जमा करण्यास सांगीतला व अर्ज पाहुन नंतर तुम्हाला फोन करते असे सांगीतले. त्यानंतर तक्रारदार व पंच हे पडताळणी पथकाकडे परत आले व त्यांनी आम्हाला वरिल प्रमाणे हकिगत सांगीतली. सदर पडताळणी कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. त्यांनतर लोकसेविका श्रीमती पांडे या मला उद्या फोन करतील त्यामुळे आपण पुढील पडताळणी कार्यवाही उद्या दि. 19/05/2026 रोजी आयोजित करावी अशी विनंती केल्याने पडताळणी कार्यवाही स्थगीत करण्यात आली होती. आज दि.19/05/2026 रोजी तक्रारदार यांना श्रीमती पांडे यांनी फोन करुन कार्यालयात भेट घेण्यासाठी बोलाविल्याचे तक्रारदार यांनी आमचे फोनवर कळविल्याने आम्ही पंच व स्टाफसह कळंब येथे जावुन तक्रारदार यांची भेट घेतली. त्यानंतर तक्रारदार यांच्या विनंती वरुन पंचासह त्यांना लोकसेविका श्रीमती पांडे यांची भेट घेण्यासाठी पाठविले असता तक्रारदार यांनी भुमी अभिलेख कार्यालय कळंब लोकसेविका श्रीमती पांडे यांची भेट घेवुन त्यांचे कामा संबधाने चर्चा केली. त्यावेळी चर्चे दरम्यान लोकसेविका श्रीमती पांडे यांनी त्यांचे मोबाईलवर 25000/- हा आकडा टाईप करून तक्रारदार यांना दाखविला त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना पंचविस हजार रूपये दयायचे का असे विचारले असता त्यांनी होकारार्थी मान हलवुन ईशा-याने लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यावेळी तक्रारदार यांनी मालकाकडुन पैसे मागवुन आणुन देतो असे म्हणुन तेथुन परत आले. सदरचे संभाषण आम्ही व पंचानी काळजीपुर्वक ऐकले असता लोकसेवीका श्रीमती पांडे यांनी तक्रारदार यांचेकडुन 25000/- रू लाच मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांना लाच रक्कम घेवुन लोकसेविका श्रीमती पांडे यांची भेट घेण्याकरिता पाठविण्याची विनंती केली. त्यावरून तक्रारदार यांनी हजर केलेली 500/- रूपये दराच्या 50 नोटांचे टिपन तयार करून त्यावर अँन्थोसिन पावडर लावुन ती तक्रारदार यांचे उजवे खिशात ठेवुन तक्रारदार व पंच यांना सुचना देवुन लोकसेविका श्रीमती पांडे यांचे कार्यालयात सापळा आजमाविण्याकरिता पाठविण्यात आले. आम्ही स्वतः व पडताळणी पथक कार्यालयाचे परिसरात सापळा लावला असता तक्रारदार यांनी पंचासह लोकसेविका श्रीमती पांडे यांची भेट घेवुन कामासंबधाने चर्चा केली व लाच मागणी केलेले 25000/- रूपये आणलेले आहेत असे सांगीतले असता त्यांनी ते पैसे टेबलावरील पुठ्ठ्याच्या बॉक्समध्ये ठेवण्याबाबत उजव्या हाताने इशारा करून सांगीतले. त्यावरून तक्रारदार यांनी त्यांचे जवळ असलेले लाच रक्कम 25000/- रू लोकसेविकेच्या सांगण्याप्रमाणे त्यांचे टेबलवर असलेल्या पुठ्याच्या बॉक्समध्ये ठेवले. त्यानंतर

तक्रारदार यांनी लोकसेविकेच्या कक्षाबाहेर येवुन सापळा पथकास नियोजित इशारा केल्यानंतर आम्ही स्वता, पंच व स्टाफसह लोकसेविका पांडे याचे कक्षात जावुन त्यांना ताब्यात घेतले व पंचासमक्ष त्यांचे कडुन लाच रक्कम हस्तगत करून सापळा पंचनाम्याप्रमाणे सविस्तर कार्यवाही करण्यात आली.एकंदरीत तक्रारदार नामे श्री. सुधाकर फकरूजी दाते यांनी दिनांक 18/05/2026 रोजी दिलेल्या लेखी तक्रारीवरुन लोकसेविका श्रीमती पांडे, परिरक्षण भुमापक, भुमी अभिलेख कार्यालय कळंब यांचेकडे तक्रारदार यांना पंचासमक्ष पाठवुन लाच मागणीची पडताळणी केली असता लोकसेविका श्रीमती पांडे यांनी तक्रारदार यांचे मालक श्री देशपांडे व त्याचे वारस यांचे नाव त्याचे मयत वडिलांच्या मालमत्तेवर फेरफार होवुन नोंद घेण्याकरिता 25000/- रू. लाच रक्कमेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने दि. 19/05/2026 रोजी पुन्हा पडताळणी करण्यात आली व त्यानंतर लावण्यात आलेल्या सापळा कार्यवाहीत दिनांक 19/05/2026 रोजी चे 16.50 ते 16.59 वा. दरम्यान भुमी अभिलेख कार्यालय कळंब जि. यवतमाळ येथे तक्रारदार यांच्या कडुन 25,000/- रू. लाच रक्कम स्विकारली. सदरची लाच रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. आरोपी लोकसेविका श्रीमती शितल विजयकुमार पांडे, वय 37 वर्षे, पद - परिरक्षण भुमापक, भुमी अभिलेख कार्यालय, कळंब, ता. कळंब जि. यवतमाळ यांचे हे कृत्य कलम 7 लाचलुचपत प्रतिबंधक कायदा 1988 अन्वये अपराध होत असल्याने त्यांचे विरूध्द सदर कलमान्वये गुन्हा नोंद करण्याकरिता मी सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद देत आहे.अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

ANIL HARIBHAU SURPAM

**Rank** (पद): PC (Police Constable) **No.**(क्र.): 16401000362AH

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन कळंब

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): RAJESH KANIRAM RA
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN75448